लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २४ वा | गुरुवार, दि. ०८ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▶ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▶ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▶ प्रिंसेस ब्लाऊज ▶ अरी वर्क ▶ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# लढायचे की पाडायचे 29 ऑगस्टला ठरवणार

## मनोज जरांगेची सोलापुरात घोषणा












**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मला गोळ्या घातल्या तरी हसत मरण पटकन पण मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळवून देणार यासाठी जरा दम धरा, त्यापूर्वी विधानसभेला आपण लढायचे की, आरक्षणाला विरोध करणाऱ्यांचे उमेदवार पाडायचे याचा फैसला 29 ऑगस्ट रोजी अंतरवली सराटी येथे करू अशी घोषणा मराठा संघर्ष योद्धा मनोज जरंगे यांनी लाखो मराठा बांधवांसमोर सोलापुरात बोलताना केली.

मनोज जरांगे पाटील यांची पश्चिम महाराष्ट्रातील शांतता रॅलीची सुरुवात बुधवारी सोलापुरातुन झाली,छत्रपती शिवाजी महाराज चौकात जरांगेची सभा पार पडली, सकाळ पासूनच मराठा समाजबांधव जरांगेना ऐकण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमले होते.

एक मराठा लाख मराठा आशा जयघोषांनी परिसर दणाणून गेला होता,दरम्यान यावेळी हातात भगवे झेंडे,डोक्यावर भगवी टोपी घालून आबालवृद्ध या शांतता रॅलीत सहभागी झाले होते,दुपारच्या सुमारास जरांगे पाटील यांचे सोलापुर शहरात आगमन झाले. ठिकठिकाणी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. दरम्यान जरांगे यांनी छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केलं., तत्पूर्वी जरांगे पाटील यांनी पार चौकातील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून श्री सिद्धेश्वर महाराजांचे दर्शन घेतले.

त्यानंतर जरांगे हे संभाजी महाराज चौकातून रॅलीने शिवाजी महाराज चौकात दाखल झाले.यावेळी मराठा समाज बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करून त्यांचे स्वागत केले

दरम्यान दुपारी 4 वाजता मनोज जरांगे यांचे सभास्थळी आगमन झाले. यावेळी त्यांचा भव्य हार घालून स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी तब्बल 1 तास भाषण केले. यावेळी त्यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत नारायण राणे,प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, राज ठाकरे यांचे नाव न घेता टीकास्त्र सोडले.,मी मॅनेज होत नाही म्हणून मला बदनाम केले जात असून विरोधात टोळ्या उभे केले जात आहेत, समाजाच्या नेत्यांनी पक्ष आणि नेता बाजूला ठेऊन फक्त मराठा आरक्षणासाठी एकत्र यावे असं आवाहन त्यांनी केले.

मराठा आरक्षणाला उघड पणे विरोध करणारे छगन भुजबळ यांना फडणवीस ज्या मतदारसंघात जातील तिथला उमेदवार पाडा असं आवाहन करत त्यांनी माढा येथील अरण मध्ये झालेल्या कार्यक्रमाचा उल्लेख केला. त्याचप्रमाणे 29 ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे एकत्र बसून निवडणूक लढवायची का अन्य उमेदवार पाडायचे हा निर्णय घेणार असून मराठ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जरांगे यांनी केले.

मराठा समाजातील लोकांनी पक्षाला आणि नेत्याला बाप मानू नका. समाजाला बाप मानून काम करा असं सांगत सर्वच पक्षाला या निवडणुकीत धडा शिकवणार असून एकच उमेदवार मराठा समाजाचा देऊ. आपसात वाद असले तरी समजाने दिलेला उमेदवार 100 टक्के मतदान करून निवडून आणा असेही मनोज जरांगे म्हणाले

भाजप ने एका मराठा क्रांती मोचार्चे 3 करून आपल्यात फूट पाडण्याचे प्रयत्न केले, मराठा आणि कुणबी एकच असताना समाज मागास असल्याचे सिद्ध झाले असताना हि आरक्षण मिळत नाही त्यामुळे आता हि लढाई निर्णायक लढा असून जोपर्यंत ओबीसीतुन मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत मला गोळ्या जरी घातल्या तरी माघार घेणार नाही अशी गर्जना जरांगे यांनी केली

दरम्यान यावेळी लाखोंच्या संख्येने मराठा समाज बांधव शांतता रॅलीत सहभागी झाले होते.,या रॅलीच्या यशस्वीतेसाठी मराठा क्रांती मोर्चा आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांनीपरिश्रम घेतले.





### शिवाजी महाराज चौकात लाखोंचा उसळला जनसमुदाय

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या संपूर्ण जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने मराठा समाज बांधव दाखल झाले होते घरातील संपूर्ण सदस्य आले होते .छत्रपती शिवाजी महाराज चौकात जिकडे तिकडे मराठा समाज बांधवांचीशागर्दी दिसून येत होती.





### रुग्णवाहिकेला वाट मोकळे करून दिली

छत्रपती शिवाजी महाराज चौकात मनोज जरांगे यांच्या आगमन झाल्यानंतर गदीर्तून एक रुग्णवाहिका आली तेव्हा रस्त्यावर बसलेल्या महिलांनी या रुग्णवाहिकेला बाजूला आहोत वाट मोकळी करून दिली.

मनोज जरांगे यांचे सभास्थानी आगमन झाल्यानंतर उभारण्यात आलेल्या भव्य व्यासपीठावर क्रेनने हार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी मराठा क्रांती मोर्चा चे अमोल शिंदे दास शेळके सुनील रसाळे बाळासाहेब गायकवाड अनंत जाधव संजय शिंदे गणेश वानकर दिलीप कोल्हे रवी मोहिते श्रीकांत घाडगे उपस्थित होते.



### रॅलीसाठी उपस्थित समाज बांधवांना भोजनाची सोय

शहर व जिल्हाभरातून शांतता रॅलीसाठी आलेल्या मराठा समाज बांधवांना फुड पाकिटे व जेवणाची सुविधा आ.बबनराव शिंदे यांनी केली होती. एक लाख समाज बांधवांना पुढील इतका मसाला भात, गोड शिरा देण्यात आला यासाठी पहाटे चार पासून यंत्रणा कार्यरत होती. मराठा क्रांती मोर्चा आयोजकाच्या वतीने जागेवरच व पाणी बाटली फुड पाकिट देण्यात आली अतिशय शांततेत व शिस्तबद्धरीत्या ही शांत झाली पार पडली.












## संपादकीय

# रोजगार विरहित विकास

जगात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था कोणती? तर उत्तर आहे भारत! जे देश जेवढे प्रगतशील समजले जातात तेवढ्या प्रमाणात आज त्यांची अर्थव्यवस्था बिकट परिस्थितीतून जात आहे. आपल्या देशातील प्रगतीकडे बघितल्यानंतर वाटते की एकीकडे प्रगती आणि दुसरीकडे वाढती बेकारी. अर्थातच ही अर्थव्यवस्था रोजगार विरहित धोरणाकडे वाटचाल करते आहे, असे वाटते. कारण बेकारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सर्वांनाच चरितार्थ चालवताना पैशांची गरज भासते. पण ती गरज सोडवताना नोकरी अर्थात कामाच्या संधी सध्याच्या काळात मिळत नाहीत.

देशात मोठ मोठे उद्योग व्यवसाय उभारी घेत आहेत. त्याचबरोबर त्यांचे नाव जागतिक स्तरावर गाजत आहे. अर्थातच त्यांनी केलेले नियोजन आणि कामाच्या पद्धती यामुळे मेहनती वगार्ची त्यांना हवी तेवढी आवश्यकता वाटत नाही. उच्च वर्ग हे सर्व उद्योगधंदे अर्थात कंपन्या चालवतात. उच्चपदस्यांना मोठे पॅकेज देऊन नियुक्त करतात. मात्र कामगारांना तुटपुंज्या पगारावर ठेवतात. त्यामुळे आर्थिक लाभ हा ठराविक वर्गाच्या हाती विभागाला जातो.

सर्व कंपन्यांचे सूत्र पैसेवाल्यांकडे अर्थात सधन वर्गाकडे जाताना दिसते. गरीब कामगार कंत्राटी पद्धतीने भर्ती करून त्यांचे श्रम शोषण केले जाते. अर्थातच कायमचा रोजगारीचा प्रश्न यातून सुटत नाही. हवे त्यावेळी कामगारास कामावरून काढले जाते. अप्रत्यक्षरीत्या त्यांच्याकडून क्षमतेपेक्षा व देयकापेक्षा भरपूर काम करून घेतले जाते. मग योग्य श्रमाचा मोबदला न मिळाल्याने बेरोजगारीचे पर्व देशात सुरू झालेले आहे. रोजगार नसतानाही जगायचे कसे? हा प्रश्न आज देशात जवळजवळ दोन तृतीयांश लोकसंख्येपुढे उभा आहे. रोजगार नसताना मनुष्य पोसणं, त्याचबरोबर संसाधनाचा वापरसुद्धा चालूच असतो! काम न करता संसाधनाचा वापर होत राहिला तर देशाची अधोगतीकडे वाटचाल होते हा अर्थव्यवस्थेचा नियम आहे. मग ही बेरोजगारीची समस्या घातक वाटत नाही का? सरकारी नियम, धोरणे व नियोजन व्यवस्था ही पूर्णपणे मोठ्या उद्योग समूहास सकारात्मक वाटते. छोट्या व लघु उद्योजकाला याच्यातून घुसमट होऊन तो फक्त मोठ्या उद्योगाचा एक पुरवठादार बनतो आणि तोही अल्प अर्थप्राप्तीमध्येच! मोठे उद्योग राबवून घेतात छोट्या उद्योगाचे नफ्याचे प्रमाण कमी होते. त्यात कर्ज घेतले असल्यास हळूहळू ह्या उद्योग संस्था तोट्यामध्ये जातात आणि मग अलगदपणे मोठे उद्योजक यांना फास टाकून त्याचा गैरफायदा घेतात.

भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर असून काही वर्षांत तिर्सया क्रमांकावर जाण्याची शक्यता आहे. जपान व जर्मनी यांच्यापेक्षा आपला देश अपेक्षितपणे चांगली प्रगती करत असून, जपान जर्मनीवर मात करून आपण तिर्सया क्रमांकावर निश्चितपणे जाऊ हेही खरं आहे! लोकसंख्येचा विचार केला तर आपल्या देशात तरुणांचे प्रमाण जास्त आहे. 18 ते 35 वयोगटातील तरुणांची संख्या 65 कोटीपर्यंत आहे. तर जपान-जर्मनी तसेच युरोपियन देश सध्या वृद्ध लोकांचे देश म्हणून संबोधले जातात. कारण तेथे ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे. तेथे तरुणांची संख्या कमी होत चाललेली आहे. त्यामुळे त्यांचे विकासाचे चक्रसुद्धा थांबले. आपल्या देशात ग्रामीण भागामध्ये शेतीची कमी उत्पादकता, तोकड्या ग्रामीण सुविधा, दुष्काळ यामुळे बेकारीत वाढ झाली. पण दुसरीकडे हाच वर्ग शहरीकरणाकडे आकर्षित होत असल्याने, शहरात लोकसंख्येचा भार वाढत आहे. त्यामुळे असुविधा, भाववाढ, महागाई या चक्रामध्ये शहरातील कामगार फसलेले आहेत. त्यामुळे त्यांना तेथील वेतनसुद्धा परवडत नाही. कमाई आणि खर्च याचा मेळ बसवणे ग्रामीण व शहरी भागांमध्येसुद्धा सारखेच होऊन बसले. देशात एकीकडे शिक्षण असणारे मनुष्यबळ वाढत असून प्रत्येकाला आपल्या पात्रतेपेक्षा जास्त प्रतिष्ठेची, पांढरपेशी, रुबाब वाढवणारी नोकरी हवी असते आणि या शोधात त्यांचा उमेदीचा काळ निघून जातो. कोणीही प्रशिक्षण कालावधी करण्यास सुरुवातीपासून धजत नाही. मग काही वर्षे गेल्यानंतर नव्याने हाच वर्ग परत कामाला लागतो. अर्थातच बेकारी बऱ्याच दिवसावर सोसल्याने नंतर थोडेफार काम मिळते. या सर्व परिस्थितीत आज तरी देशाची आर्थिक संरचनेतील धोरणात परिवर्तनीय बदल करणे आवश्यक आहे.

युवकांना रोजगार नसल्याने भ्रमनिरास होऊन ते वेगवेगळ्या जाती -धमार्चे मोर्चे त्याचबरोबर राजकीय प्रचाराकडे वळत आहेत. झटपट प्रसिद्धी कुठल्यातरी पक्षाच्या/पंथाचा कार्यकर्ता म्हणून फुशारकी करण्यास त्यालाही आनंद मिळतो. त्याकडे तरुण आकर्षिला जातो. मग त्याला भडक भाषणे, भडक कृत्य करण्याची सवय लागते. स्वतःचे कर्तृत्व, शिक्षण व रोजगाराच्या संधी याच्यावर तो पाणी सोडतो.

सध्या रोजगार वाढीचा वेग हा आर्थिक समृद्धीपेक्षा फार कमी आहे. ज्यावेळी उद्योग क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढत जाते तेथे मनुष्यबळाचा वापर कमी होऊन स्वयंचलित यांत्रिकीकरण वाढत जातं. मग हेही कारण बेकारीस पुरेशी होतं. देशात उद्योग व रोजगार पूरक असे अभ्यास करून प्रशिक्षण कौशल्य विकास रोजगार निर्मितीसाठी हवे आहेत.

# पृथ्वीच्या व प्राण्यांच्या रक्षणासाठी नागपंचमीच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साह दिसून येतो. श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते. नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो. नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे.या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी.पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात.अशीही आख्यायिका आहे की एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे.त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर,वखर,कोणतेही खोदकाम करीत नाही.त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.भाज्या चिरायच्या नाही, तव्याचा वापर नाही, कांडन नाही, कापन नाही, असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुतीर्ची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज (सजावट) केल्या जाते.त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने पाळला जातो.श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची, शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी सण येतात. सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे. सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा. तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील "नाग मंडळे"नाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली. त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुतीर्ची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूतीर्ची मिरवणूक काढतात.आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.आजही भारतातील महाराष्ट्र,राजस्थान, गुजरात,केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे. याठीकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे. त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो.भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी, वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते.त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणें अत्यंत गरजेचे आहे. याकरीता श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व जंगलातील प्राण्यांना जंगलात रहाण्याचा आनंद मिळेल. आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे .कारण वृक्षाशीवाय जमीन अधुरी आहे.त्यामुळे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे.पृथ्वी साबुत रहाली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे. कारण वृक्ष कटाईमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे. त्यामुळे भुकंप, महाप्रलय, सुनामी, अती थंडी,अती उष्णता, ज्वालामुखी, दुष्काळ,भूस्खलन अशा विविध धोकादायक घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असून भयावह रूप धारण होत आहे.याकरीता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी "झाडे लावा जीव सृष्टी वाचवा "हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे.

नागव्दार स्वामी की जय!
जय नाग देवता! हर हर महादेव!

## प्रबोधन

# नामदेव थोर । केले देशाटन

मराठी साहित्यातील आद्य चरित्रकार आणि आद्य आत्मचरित्रकार कोण, असा प्रश्न विचारला गेला तर संत नामदेवांचंच नाव सांगावं लागतं. (जन्म १२७०; मृत्यू १३५०; पुण्यतिथी ८ ऑगस्ट) संत आणि सायन्स या क्रांतिकारी ग्रंथाचे लेखक प्रा.मा.का. देशपांडे म्हणतात, 'मराठीत चरित्रलेखन करणारा पहिला लेखक म्हणजे संत नामदेव. यांनी ज्ञानेश्वरांचं चरित्र रसाळ भाषेत लिहिलं असून आत्मचरित्रही लिहिलं आहे.' याच ग्रंथात प्रा. देशपांडे सर्वच संतांचा उपहास वय वाढलेली बाळे अशा शब्दांत करतात. पण संत नामदेवांचा उपहास त्यांना करता येणार नाही. कारण ज्ञानप्रसाराचं ध्येय उराशी बाळगणं हे बाळांचं काम नाही. पण संत नामदेव त्यांना ज्ञानमार्गी संत मानावं, असं ध्येय ठेवून जगले. त्यांची नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी। ही ओवी सुपरिचित असून ज्ञानदीप लावू जगी हे ध्येय महाराष्ट्रातील कित्येक शिक्षणसंस्थांनी आपल्या बोधचिन्हासाठी स्वीकारलं आहे.

दगडाच्या मूर्तीला देव न समजता दगड म्हणण्याचं धाडस संत कबीरांमध्ये अंकुरलं, ते संत नामदेवांमुळे! संत कबीर हे संत नामदेवांचे वैचारिक वारस होते. डॉ.हे.वि.इनामदार लिहितात, 'पंढरीच्या भक्तिमागार्चा नामदेवांनी पंजाबात प्रारंभ केला. त्यातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक आणि पीपा या संतजनांना प्रेरणा मिळाली.' कबीरांनी पूजाअर्च्या, देवध्यान, यांचा निषेध करण्याची परंपरा संत नादेवांकडूनच घेतली. माला तो कर में फिरे। जीभ फिरे मुखमाही ॥ मनुवा तो चँहुदिसी फिरे। यह तो सुमिरन नाही ॥ कबीरांचा हा दोहा नामदेवांच्या पुढील अभंगाशी तंतोतंत जुळतो. नामदेव म्हणतात, मुखी नाही नाम। काय जपतो श्रीराम ॥ काय आसन घालून। मुखी नाही नारायण॥ टिळे, टोपी, माळा, दावी। भोळ्या भाविकांसी गोवी ॥ अर्थात, गुरू-शिष्यांचं समाजप्रबोधन एकसारखंच आहे. त्यामुळेच शुद्ध निरीश्वरवादी आणि ऐहिक गुरूंचा उपदेशच शिरोधार्य आणि श्रद्धेचं अधिष्ठान मानणाऱ्या शीख संप्रदायाच्या ग्रंथसाहेब या धर्मग्रंथात संत नामदेवांचे तर्कनिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी असे, शंभराहून अधिक अभंग समाविष्ट केले गेले.

अंधश्रद्धा निर्मूलन हा शब्द अस्तित्वात येण्याच्या आधी नामदेवांनी त्यासाठी अभंग लिहिले. ते म्हणतात, दावी जडीबुट्टी जारण- मारण। नागवे हिंडणे काय काज ॥ दावी उग्र तप केले उपवास। फिरताही देश काय काज ॥ नग्न सांप्रदायिक, निर्लज्ज साधू, संन्यासी झालेल्या गृहस्थांचं आचरण, उपवास, मंत्रतंत्र, जडीबुटीचं प्रचलन, सारं सारं नामदेवांनी नाकारलं, धिःकारलं. त्यामुळे महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक चक्रधरस्वामींची अंधश्रद्धा निर्मूलनाची परंपरा त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून पुढे चालवली, असं म्हटलं पाहिजे. त्यांच्या या कार्याविषयी डॉ. ललिता मिरजकर म्हणतात, 'ज्ञानाची अंतिम अवस्था प्राप्त झाल्यावर नामदेवांना बाह्य अवडंबराचा फोलपणा कळून चुकला, म्हणूनच त्यांनी ईश्वरप्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या बाह्य उपचारांचा आणि अंधश्रद्धांचा निषेध केला.'

भारतभ्रमण करीत संत नामदेव पंजाबात गेले आणि तेथेच ते अठरा वर्ष राहिले. देशाटनामुळे हिंदू आणि मुसलमान दोघांचेही धर्माचरणातील दोष आणि त्यांची व्यर्थता नामदेवांच्या लक्षात आली. ते म्हणतात, हिंदू अंधा तुरुक काणा। दुहां ते गियानी सयाना ।। हिंदू पुंजै देहुरा मुसलमान मसीत। नामे सोई सेविया जह देहुरा न मसीत ।। अर्थात, माणसाने हिंदू-मुसलमान असण्यापेक्षा ज्ञानी असावं आणि ज्ञान्याने मंदिर किंवा मशिदीत जो नसतो त्या ज्ञानीपणाची उपासना करावी. पूवार्युष्यात देवभक्ती, कर्मकांड केलेल्या नामदेवांनी आपल्या पूर्वसंस्काराबद्दल व्यासपुराणांना जबाबदार धरलं आहे. ते म्हणातात, नामा म्हणे नाही माज्याकडे दोष। पुराण हे व्यास वाक्य आहे ॥ नामदेवांनी व्यासकायार्ची केलेली कठोर चिकित्सा ही अंधश्रद्धा-निर्मूलनाची गंगोत्री आहे, हे आज स्वतःला अंधश्रद्धा निर्मूलक म्हणवणाऱ्यांना ठाऊक आहे का?

संत नामदेवांच्या जीवनकायार्चे मूल्यमापन करताना डॉ. मिरजकर म्हणतात, 'शुद्ध आचरण हीच नामदेवांची शिकवण आहे. हिंदू- मुसलमान दोघेही रूढ़िवादी असून चुकीच्या मागार्ने जात आहेत. दोघांहीमध्ये धार्मिक कट्टरपणा आहे. खोट्या धार्मिक आचार- विचारांच्या नावावर अंधश्रद्धाळू होऊन, सत्य आणि नैतिकता सोडून चालणाऱ्यांची नामदेवांनी कानउघाडणी केली आहे. बाह्य उपचारांपेक्षा आंतरिक भावनेला त्यांनी जास्त महत्त्व दिलं आहे.'

धर्माचं खरं तत्त्व समजावून सांगताना थोर संत नामदेव इहवादाच्या, वास्तववादाच्या भूमीवर उतरतात. ते म्हणतात, ज्या कारण त्रिभुवन फिरी आये। सो निधान घटि भीतरि पाये॥ अर्थात, 'आपले शरीर हाच सौख्याचा अनमोल ठेवा, खजिना आहे. जगात हिंडून लाभ काय? आपल्या जगण्यापेक्षा महत्त्वाचं दुसरे काही नाही. 'त्यासाठी लक्षात घ्या-

आद्य चरित्रकार। आत्मचरित्रकार
नामदेव थोर। संतश्रेष्ठ ।।१
केले देशाटन। समाज पाहिला
गोंधळ पाहिला। धार्मिकांचा ॥२
अंधश्रद्धेमुळे। व्यथित जहाले
कान उपटले। लबाडांचे ॥३
हिंदू नव्हे ज्ञानी। तुर्क नव्हे मूर्ख
दोघे सारखेच। कर्मकांडी ॥४
नामदेव देती। दोष दोघांनाही
सन्मागार्ची ग्वाही। देती सदा ॥५
आपले शरीर। सुखाचे साधन
आपले जीवन। हाच स्वर्गः ॥६
मानवतावादी। शुद्ध आचरण
नसतो याहून। धर्म मोठा ॥७
देह हे देऊळ। प्राण हा ईश्वर
नामदेव थोर। सांगतात ।।८



प्रा.डॉ.जे.बी.शिंदे

# मराठा आंदोलकांनी अडवला राज ठाकरेंचा ताफा, नांदेडमध्ये राडा



**नांदेड (कटूसत्य वृत्त):-** राज ठाकरे यांचा ताफा मराठा आंदोलकांनी अडवला आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या नांदेड दौऱ्यावर आहेत. आज संध्याकाळी राज ठाकरे नांदेडमध्ये पोहोचल्यानंतर ते विश्रामगृहात काही काळ थांबले होते, यानंतर त्यांचा ताफा खासगी हॉटेलमध्ये जाण्यासाठी विश्रामगृहाबाहेर निघाला, तेव्हा मराठा आंदोलकांनी राज ठाकरेंच्या ताफ्यासमोर घोषणाबाजी केली.

एक मराठा लाख मराठा, अशा घोषणा देत आंदोलकांनी गोंधळ घातला, यावेळी उपस्थित पोलिसांनी त्यांना अडवलं आणि राज ठाकरे यांचा ताफा बाहेर निघाला. दोन दिवसांपूर्वी धाराशिव जिल्ह्यात देखील असाच गोंधळ झाला होता. त्या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये राज ठाकरे यांच्या दौऱ्यादरम्यान मोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

विश्रामगृहाच्या बाहेर देखील पोलिसांचा फौजफाटा होता. अनुचित प्रकार घडू नये त्याची खबरदारी नांदेड पोलिसांनी घेतली होती, मात्र तरीही विश्रामगृहासमोर येऊन मराठा आंदोलकांनी घोषणा देत राज ठाकरे यांचा निषेध केला.

मनोज जरांगे हे प्रमाणिक आंदोलक आहेत, मात्र तरीही राज ठाकरे त्यांच्यावर टीका करतात, राज ठाकरेंनी मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला नाही, त्यामुळे त्यांचा विरोध आणि निषेध करण्यासाठी प्रयत्न केल्याची प्रतिक्रिया आंदोलकांनी दिली. दरम्यान उद्या देखील दिवसभर राज ठाकरे नांदेडमध्ये आहेत, त्यामुळे पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे.

# जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे 6 लाख 15 हजार अर्ज प्राप्त - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाची अत्यंत महत्वकांक्षी योजना म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्यात सर्वत्र प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने ही जिल्ह्यात या योजनेची प्रचार प्रसिद्धी सुरू असून दिनांक 7 ऑगस्ट 2024 सायंकाळी पाच वाजेपर्यंत 6 लाख 14 हजार 970 अर्ज या योजनेत तालुकास्तरीय समितीकडे प्राप्त झालेले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत जिल्ह्यातील एक ही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा दक्ष राहून काम करत आहे. ग्राम स्तरावर अशा सेविका ग्रामसेवक त्यांच्याकडे अर्ज प्राप्त होत आहेत तर महा-ई-सेवा केंद्रा द्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज अपलोड केले जात आहेत. जिल्हा महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद जिल्हा परिषदेचा महिला बाल विकास विभाग आदी विभागाच्या वतीने अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून ही योजना सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यात प्रशासनाला यश प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम स्तरावर अंगणवाडी सेविका मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यार्चे अर्ज भरून घेत आहेत. तसेच प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना या योजनेविषयी सविस्तर माहिती देऊन कोणत्या कागदपत्राची पूर्तता करणे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन अंगणवाडी सेविकेकडून केले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात या योजनेचे अर्ज भरण्यासाठी पात्र महिला मोठ्या संख्येने येत आहेत.

या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरापर्यंत अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेले असल्याने जवळपास चार लाख अर्ज ऑफलाइन पद्धतीने प्रशासनाकडे प्राप्त झालेले होते. तर नारीशक्ती दूत ॲपवर दोन लाख पंधरा हजार अर्ज ऑनलाईन प्राप्त झालेले आहेत. ऑफलाइन पद्धतीने प्रशासनाकडे आलेले सर्व अर्ज अत्यंत गतीने ऑनलाईन करण्यात आलेले आहेत. प्राप्त सर्व अर्जांची तपासणी तालुकास्तरीय तपासणी समितीने केलेली असून यातील 5 लाख 48 हजार 659 अर्ज समितीने जिल्हास्तरीय समितीकडे पाठवलेले आहेत तर 59 हजार 389 अर्ज कागदपत्रांच्या त्रुटीमुळे रद्द करण्यात आलेले असून कोणत्या कागदपत्राची कमतरता आहे याविषयीचा मेसेज संबंधित लाभार्थ्यांच्या मोबाईलवर तालुकास्तरीय समितीने पाठवलेले आहेत. रद्द केलेल्या अर्जावर संबंधित लाभार्थ्यांनी त्रुटीबाबतचे कागदपत्र अपलोड केल्यास त्यांचे अर्ज पुन्हा जिल्हास्तरीय समितीकडे वर्ग करण्यात येणार आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी आर. बी. काटकर व जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली आहे.

तालुकास्तरीय समितीकडून प्राप्त झालेले 5 लाख 48 हजार अर्ज यावर जिल्हास्तरीय समिती कडून छाननी करण्यात येऊन विधानसभा क्षेत्रनिहाय गठित होणाऱ्या समितीची अंतिम मंजुरी घेऊन पुणे येथील आयुक्त महिला व बालविकास यांच्याकडे पाठवण्यात येणार आहेत. आयुक्त महिला व बालकल्याण पुणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या मंजूर अर्जावर महिला व बालकल्याण आयुक्त कार्यालयाकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट पैसे जमा करण्याची कार्यवाही होणार आहे.

जिल्ह्यात तालुकास्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर तालुकास्तरीय समितीकडून छाननी करण्यात येऊन जिल्हास्तरीय समितीकडे पाठवण्याची टक्केवारी 89.22% इतकी आहे.

# बार्शी तालुक्यातील सर्व पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी: सूर्यकांत चिकणे

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील सर्व मंडलातिल सर्व पिके सततच्या पावसामुळे पिवळी पडली आहेत,आठ दिवसात पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत द्यावी, एन डी आर एफ किंवा एस डि डि आर एफ मधून तात्काळ शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी गुळपोळी गावातील एसटी स्टँडवर सूर्यकांत चिकणे यांचे नेतृत्वखाली दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

बार्शी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी भैरवनाथ शेतमजूर संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत चिकणे यांनी केली आहे,आठ दिवसात पंचनामे करून मदत न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे उपोषण करणार असा इशारा सूर्यकांत चिकणे यांनी दिला आहे.



बार्शी तालुक्यात सतत पाऊस पडत आहे सततच्या पावसामुळे सर्वच पिकांचे नुकसान झाले आहे व सर्व पिके पाण्यात गेली आहेत व द्राक्षे बागेला काडयांना मुळ्या आल्या आहेत, द्राक्षे बागेला मुळ्या आल्याने फळ धारणा होत नाही व सर्वच पिकांचे नुकसान झाले आहे म्हणून बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना तात्काळ पंचनामे करून ,शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी असे रास्ता रोको आंदोलन करताना जनहित शेतकरी संघटनेचे तालुका संघटक रविंद्र मुठाळ खामगाव व शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते रामराव आपपाराव काटे पाटील यांनी तात्काळ मदत मिळावी अशी मागणी केली आहे, सरकार शेतकऱ्यांना मदत देताना हात आखडता घेत आहे असे आरोप शिंदे सरकारवर रामराव पाटील यांनी आरोप केले आहेत.

सदरच्या मागण्याचे निवेदन प्रभारी मंडल अधिकारी शिंदे व कृषी सहायक जगदाळे यांनी स्विकारले सदर आंदोलनात खामगाव,गुळपोळी,मालवंडी सुर्डी येथील खालील प्रमाणे शेतकरी उपस्थित होते, सूर्यकांत चिकणे, रामराव पाटील, रविंद्र मुठाळ, शहाजी चिकणे, परशुराम दाजी पाटील, कृष्णाथ भिमराव चिकणे, विशाल विठ्ठल चिकणे, गोपाळ काळे, दत्तात्रय महादेव गुरव, अशोक गंगाराम चिकणे, चांद शेख,ईलाई शेख, प्रशांत गणेश चिकणे, रामचंद्र हनुमंत चिकणे, अर्जून शिंदे, श्रीकांत विजय चिकणे,सौरभ नागनाथ कापसे, प्रमोद रविंद्र गायकवाड,अतुल सूर्यकांत चिकणे, अक्षय सावंत, आकाश चिकणे,सचिन पाडूळे, दिलीप लक्ष्मण चिकणे नानासाहेब फोके, परमेश्वर पांडुरंग चिकणे यांचेसह दिडशेहून अधिक शेतकरी रास्ता रोको आंदोलनास उपस्थित होते.

## वात्रटिका

### आड(सुळ)मुठ धोरण

शब्द दिला कोणाला
कोणी नाही पाळला...
गरजेपुरता गरजेसाठी
सारा डाव खेळला...
आशा लागणं लावणं
फार वाईट असते...
राज्यपाल करतो म्हणून
कोणी करत नसतो...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पूर परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे

## आ. समाधान आवताडे यांचेकडून प्रशासकीय बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना





**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी आणि वीर धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. वरील धरणातून उजनीकडे येणाऱ्या पाण्याचा प्रवाह मोठा आहे. पावसाच्या पाण्यामुळे पाणी अधिक वाढत आहे. यामुळे भीमा नदीला पूर येण्याची शक्यता वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील प्रशासनाने पूर परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज राहावे. अशा सूचना पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार समाधान आवताडे यांनी प्रशासनाला दिल्या आहे.

उजनी आणि वीर धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्याचे प्रमाण वाढत आहे. यावर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे.यासाठी पंढरपूर येथील प्रांत कार्यालय येथे आमदार समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी प्रशासनाची बैठक घेण्यात आली. यावेळी वरील सूचना देण्यात आल्या आहेत.

सदरच्या बैठकीसाठी पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे, उपमुख्य अधिकारी सुनील वाळूजकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तसेच जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत आ.समाधान अवताडे यांनी प्रशासनाला उजनी व वीर धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात येत आहे. यामुळे भीमा नदीतील पाण्याची पातळी वाढत आहे. यामुळे पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे पंढरपूर शहर आणि नदीकाठच्या गावातील नागरिकांचे स्थलांतर करावे लागणार आहे. याच नागरिकांना इतर सुविधा देण्यासाठी प्रशासन यंत्रणा सज्ज ठेवण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत.

सन 2019 मध्ये आलेल्या पुरामध्ये भीमा नदीत तीन लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग होता. यामुळेच मोठा पूर आला होता. सध्या मात्र भीमा नदीत एक लाख वीस हजार ते एक लाख 40 हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग आहे. यामुळे मागील वेळी पेक्षा सध्यातरी मोठा धोका वाटत नाही. मात्र यापुढील पावसाची परिस्थिती आणि वाढत असलेले पाणी, यामुळे धरणातील पाणी मोठ्या प्रमाणात सोडल्यास पुराचा धोका वाढून मोठी पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते. यामुळेच आतापासूनच या पार्श्वभूमीवर प्रशासनाला सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# गोदूताई वसाहतीत तेलुगू भाषिक तरुणांचा भव्य मेळावा संपन्न

## मास्तरांना आमदार करण्याचा तेलुगू भाषिक तरुण एकमुखी निर्धार !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मी 1955 साली माझ्या बालपणी रामायणाची पोथी वाचत असे. त्यावेळी रामनवमी च्या पार्श्वभूमीवर आमच्या घरालगत असणाऱ्या मारुती मंदिरात तेथील पुजारी यांनी श्रीराम हे शब्द 1लाख वेळा कोण लिहितील त्यांना 1 रुपया बक्षीस मिळेल असे जाहीर केले त्यावेळी आमच्या मित्रमंडळ मार्फत पैज लागली आणि मी एकटाच 1 लाख वेळा श्रीराम लिहून श्रीरामकोटी मंदिरांच्या पुजारीना अर्पण केले आणि 1 रुपया बक्षीस मिळवले.तेव्हा पासून पुराणात दाखवलेल्या श्रीरामांचा मार्ग अवलंब करत आजमितीस मी जनतेची निस्पृह सेवा करत आहे. लोकशाही अधिष्ठित रामराज्य आले पाहिजे. रामाच्या नावाने राकारण करणारे लोकांची सेवा करावी दिशाभुल करू नये अशी टीका आडम मास्तर यांनी केली.

बुधवार दिनांक 7 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजता कॉ. गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार वसाहत कुंभारी येथे स्थानिक सर्व तेलुगू भाषिक तरुणांचा मुरलीधर सुंचू यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा पार पडला.

यावेळी स्थानिक तरुणांनी वसाहतीतील समस्यांबाबत चर्चा केली.प्रामुख्याने वसाहतीत घनकचरा व्यवस्थापन, स्मशानभूमी, अवैध धंदे, बेकायदेशीर दारू अड्डे, बेरोजगार तरुणांना रोजगारराच्या संधी, विद्यार्थिनींनी साठी वरिष्ठ महाविद्यालय, महिलांसाठी घरगुती काम यासंबधी मास्तरांनी योग्य ती मदत करावी अशा अपेक्षा व्यक्त केले आणि यंदा वसाहतीच्या सर्वांगीण विकासासाठी आडम मास्तरांना आमदार करण्याचा एकमुखी निर्धार केला.

यावेळी पुढे बोलताना आडम म्हणाले की, निरंतर परिश्रमातून गोदूताई वसाहतीत लोकांच्या पिण्याची पाण्याची टंचाई दूर केली आहे. वसाहतीत सर्व तेलुगू भाषिक लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत.ही एकी चिरंतन राहावी.आपल्या श्रद्धा



प्रती मी प्रचंड आदर करतो.तरुणांनी मांडलेले मुद्दे हे अत्यंत महत्त्वाचे व कळीचे आहेत.त्याला न्याय देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.तरुण हे या देशाचे भवितव्य असून ते आज अंधारात चाचपडत आहे.हे अत्यंत गंभीर आहे. एवढेच नसून

बेरोजगार तरुणांना रोजगार देण्याची जबाबदारी ही सरकारची आहे मात्र सरकार याबाबत उदासीन आहे.यासाठी तरुणांनी वज्रमूठ आवळण्याची गरज आहे. यासाठी आपण मैदानात उतरले पाहिजे अशा उत्स्फूर्त शब्दांत युवकांत स्फुलिंग चेतावले. त्यानंतर टाळ्यांचा कडकडाट झाला.जोरदार घोषणबाजीही झाली.

यावेळी अशोक इंदापूरे, अॅड. अनिल वासम, अशोक बल्ला आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यापीठावर मधुकर पुठ्ठा, नितीन यादगिरी, बालाजी कोडम, रवि गेंट्याल, राजू मिठ्ठा आदी तरुण कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

या मेळाव्याचे सूत्रसंचालन विजय हरसुरे व आभार प्रदर्शन योगेश आकीम यांनी केले.

सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी दिनेश बडगु, नरेश गुल्लापल्ली,शाम आडम, चंटी बिटला, बाळकृष्ण मल्याळ, मधुकर चिल्लाळ,बालाजी तुम्मा, नागेश जल्ला, कुमार येलगेटी,प्रभाकर गेंट्याल, राजेंद्र गेंट्याल , राधा गोपालबंडी आदींनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (सेट) मध्ये सुरज दशरथ गायकवाड यांचे यश संपादन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांनी ७ एप्रिल २०२४ रोजी घेतलेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (सेट) मध्ये येथील सुरज दशरथ गायकवाड याने पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले असून तो चांगल्या मार्क्सने उत्तीर्ण झाला आहे.

सीनियर कॉलेज मधील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ही परीक्षा अत्यावश्यक असते. सुरज गायकवाड याने इंग्रजी व पोलिटिकल सायन्स विषयात पुणे विद्यापीठातून एम.ए.केले आहे तर ग्रॅज्युएशन बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कॉलेजमधून केले आहे.



सुरज गायकवाड याचे या यशाबद्दल विकास अधिकारी डी.एन. लंगोटे, टेंभुर्णी प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश चौगुले, उपाध्यक्ष अमरसिंह शेंडे, सचिव धनंजय मोरे सर्व पत्रकार यांनी अभिनंदन केले आहे.

# शैक्षणिक व सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहीन - महेश कोठारी



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी रोटरी तसेच कॅन्सर फाउंडेशनच्या माध्यमातून प्रत्येक शाळांना मदत करणार. मागील काळात शैक्षणिक व सामाजिक कार्यात जे उल्लेखनीय काम केले आहे तेच काम पुढील काळातही करण्यासाठी मी अग्रेसर असेल असे मत रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष महेश कोठारी यांनी व्यक्त केले. ट्विंकल स्टार स्कूलमध्ये शैक्षणिक साहित्य व वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते.

खर्चाला फाटा देत माझा वाढदिवस शैक्षणिक साहित्य वाटप करून व वृक्षारोपण करून केला जातो, हे मी माझ्यासाठी भाग्याचे समजतो. वाढदिवसानिमित्त त्यांचा सन्मान संस्थेच्या वतीने करण्यात आला. त्यावेळी सत्कारला उत्तर देताना त्यांनी संस्थेचे व शाळेचे आभार मानले. पुढे कोठारी म्हणाले की शाळेला येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आमची टीम नेहमीच कटिबद्ध असेल. या लावलेल्या झाडांचा वाढदिवस येणाऱ्या पुढील काळात वर्षानुवर्षे आपण करत राहू असे मत संस्थेचे संस्थापक प्रा.हरिश्चंद्र गाडेकर यांनी आपल्या प्रस्तावनेत केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे नूतन अध्यक्ष श्रीकांत लोंढे, तर प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लबचे सचिव संदीप मोकाशी, कॅन्सर फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश भणगे, क्रांतिकारी संघर्ष सेनेचे टेंभुर्णी शहराध्यक्ष निलेश खरात, पारस कटारिया, महेश कोकीळ, मारुती वाघे, हरिश्चंद्र गाडेकर, रेखा गाडेकर, अर्चना गाडेकर, मनीषा सोनवणे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली सितारे यांनी केले. आभार जेष्ठ शिक्षिका मनीषा सोनवणे यांनी मांडले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष श्रीकांत लोंढे, कॅन्सर फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश भणगे, क्रांतिकारी संघर्ष सेनाचे टेंभुर्णी शहराध्यक्ष निलेश खरात, महेश कोकीळ, प्रिन्सिपल रेखा गाडेकर यांनी आपली मनोगते व्यक्त केली व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपाली सितारे, प्रियांका पांडगळे, अशा सुतार, सोमनाथ खरसांडे, नितीन बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोकमंगल शिक्षक रत्न, आदर्श शाळा पुरस्कार - २०२४

## अकरा शिक्षक आणि दोन शाळांना सन्मानित करणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकमंगल फाउंडेशन आणि लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षक रत्न पुरस्कारांसाठी गुणवत्तावान शिक्षकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सोलापूर जिल्ह्यात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या पुरस्कार योजनेत प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयीन आणि वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना शिक्षक रत्न पुरस्कार दिले जातात.

त्याशिवाय क्रीडा शिक्षक व कला शिक्षक यांनाही सन्मानित केले जाते. अध्यापन सेवेमध्ये विशेष उल्लेखनीय सेवा बजावत विविध उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकाला पुरस्कार दिला जातो.

सोलापूर जिल्ह्याची कीर्ती जगभरात पसरवणाऱ्या गुणवत्तावान विद्यार्थ्याला प्रेरणा देणाऱ्या शिक्षकाला डॉ.अब्दुल कलाम पुरस्कार दिला जातो. अशा अकरा शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या दोन प्राथमिक शाळांना आदर्श शाळा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या पुरस्काराचे स्वरूप प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह आणि अडीच हजार रुपयांची पुस्तके असे आहे. बारा वर्षापेक्षा अधिक सेवा बजावलेल्या कोणत्याही शिक्षकाला या पुरस्कारासाठी अर्ज करता येईल. त्यासाठी विहित नमुन्यातील अर्जावर माहिती भरून संबंधित शिक्षकांना प्राप्त झालेली प्रमाणपत्रे जोडून प्रस्ताव सादर करावा लागेल.

विहित नमुन्यातील अर्ज लोकमंगल पतसंस्था किंवा लोकमंगल मल्टीस्टेट सहकारी संस्था यांच्या कोणत्याही शाखेत उपलब्ध असेल. शिवाय हा विहित नमुन्यातील अर्ज लोकमंगल फाउंडेशन च्या मुख्य कार्यालयात उपलब्ध असेल. पत्ता अन्नपूर्णा, १३ /अ सह्याद्री सोसायटी, इ एस आय हॉस्पिटलच्या मागे, विकास नगर, होटगी रोड सोलापूर.

पुरस्कारासाठी दाखल केले जाणारे प्रस्ताव याच पत्त्यावर आणून द्यावे लागतील. इच्छुक शिक्षकांना आणि शाळांना प्रस्ताव दाखल करण्याचा शेवटचा दिवस 20 ऑगस्ट हा असेल. संपर्क - ०२१७ २६०६०७०. किंवा ७७२२० ३९६१७

# पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दि.1 जुलै 2024 या अर्हता दिनांकावर मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त कार्यक्रम दुसरा भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यासाठी मतदार यादी निरिक्षक म्हणून पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली असून ते मतदार यादी निरीक्षक म्हणून दि. 8 ऑगस्ट 2024 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून लोकप्रतिनीधी, राजकीय पक्षांच्या जिल्हा अध्यक्ष यांची नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर याठिकाणी दुपारी 3 वाजता बैठक घेणार आहेत.

तरी मतदार यादी संदर्भात नागरीकांना काही सुचना असल्यास



आजच dydeosolapur@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात याव्यात, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.

यावेळी विभागीय आयुक्त पुलकुंडवार हे सर्व मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व नोडल अधिकारी स्वीप यांच्या कामाचाही आढावा घेतील.

# ऐतिहासिक कार्याच्या माध्यमातून लोकनेते सूर्यकांतदादांनी जनसेवा जपली- पांडुरंगभाऊ माने देशमुख

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** लोकनेते स्वर्गीय सूर्यकांतदादा माने देशमुख यांनी आपले जीवन समाजसेवेसाठी समर्पित केले होते. जनसेवेचा ध्यास घेऊन त्यांनी ऐतिहासिक कार्य केले त्यामुळे आजही त्यांच्या कायार्ला उजाळा मिळताना दिसतो आहे असे मत वेळापूर येथील आदर्शवत व्यक्तिमत्व तथा श्री महादेव देवालय ट्रस्टचे ट्रस्टी पांडुरंगभाऊ माने देशमुख यांनी व्यक्त केले.

लोकनेते स्वर्गीय सूर्यकांत माने देशमुख यांच्या जयंतीनिमित्त वेळापूर ग्रामस्थांच्या वतीने विकास सेवा सोसायटी या ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अभिवादन सभेत ते बोलत होते.याप्रसंगी सुरुवातीला जयंतीनिमित्त लोकनेते सूर्यकांत माने देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पत्रकार सुर्यकांत भिसे यांनी अनेक आठवणी सांगितल्या.



यावेळी विकास सेवा सोसायटीचे व्हाईस चेअरमन महादेव ताटे,कै.सूर्यकांतदादांचे ज्येष्ठ चिरंजीव तथा श्री महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतभैया माने देशमुख, मार्केट कमिटीचे संचालक बाळासाहेब माने देशमुख, सोसायटीचे संचालक दत्तात्रय माने, श्रीधरराव देशपांडे, विश्वजीत माने देशमुख, ग्रामपंचायत सदस्य दीपक राऊत, अॅड.ताटे, शरद साळुंखे, राजकुमार बनसोडे, मोहन आडत, पत्रकार सूर्यकांत भिसे, अनंत क्षीरसागर, विश्वास वाघे, रंगनाथ माने आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी लोकनेते सूर्यकांतदादाचे विश्वासू सहकारी तसेच वेळापूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्व. सुर्यकांतदादा यांच्या आठवणींना मिळाला उजाळा**

सोलापूर जिल्हा परिषदेचे सुर्यकांतदादा उपाध्यक्ष असताना शेतकऱ्यांसाठी विविध योजना त्यांनी राबविल्या. आपल्या दातृत्वातून त्यांनी अनेकांचे संसार फुलवले. वेळापूर येथे ऐतिहासिक निर्णय घेत महावितरण ला जागा देणे, पाण्याचा प्रश्न मिटावा यासाठी तळे बांधण्यासाठी देखील त्यांनी जागा दिली. शाळा, बंधारे, समाजमंदिरे, हातपंप अशा माध्यमातून त्यांनी आपल्या कार्याची ओळख निर्माण केली.

# मोहोळ विधानसभा मतदारसंघाच्या निरीक्षकपदी उत्तमराव जानकर

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मोहोळ विधानसभा मतदार संघाच्या विशेष निरीक्षक पदी माळशिरस तालुक्याचे नेते उत्तमराव जानकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या भरघोस यशानंतर शरद राष्ट्रवादी गट विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागल्याचे दिसत असून मोहोळ विधानसभा मतदार संघावर प्रामुख्याने राष्ट्रवादीचे वर्चस्व असल्याने ही जागा शरद राष्ट्रवादीला सुटणार असल्याचे सांगितले जाते. याच अनुषंगाने माळशिरस तालुक्याचे हेवीवेट नेते उत्तमराव जानकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या मोहोळ विधानसभा मतदारसंघाच्या विशेष निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली असून येणाऱ्या काळात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवारीच्या अनुषंगाने कोणती व्युहचरचना त्यांच्याकडून आखली जाते हे पाहणं औत्सुक्याचे असून जानकर यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढल्याचे दिसून येते.

> सध्या आम्ही महाविकास आघाडी म्हणून लढतोय. त्यानुसार मोहोळ मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला जाते. या जागेवर आमचाच दावा राहिल. त्यामुळे निवडून येणारा उमेदवार असणं तितकंच गरजेचं आहे. लवकरच मतदारसंघाचा दौरा लावून पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहे. राजकीय स्थिती माहिती करून इच्छुक उमेदवारांची मते जाणून अहवाल वरिष्ठांकडे पाठवून पुढील निर्णय घेतला जाईल.
>
> **- उत्तमराव जानकर,** निरीक्षक, मोहोळ मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

# मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीत काँग्रेसचे शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मराठा समाज बांधवांनी सोलापूर येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या शांतता रॅलीत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या मार्गर्शनाखाली शहर अध्यक्ष चेतनभाऊ यांच्यासमवेत सोलापूर शहर व जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी काँग्रेस भवन येथे एकत्रीत होऊन शांतता रॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे आणि पदाधिकाऱ्यांनी यांनी चार हुतात्मा पुतळा जवळ मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत केले.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापूरे, प्रदेश सरचिटणीस संजय हे, माजी महापौर आरिफ शेख, मा. नगरसेवक विनोद भोसले, अशोक नींबर्गी, युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर



टेकाळे, महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, अनिल मस्के, दीनानाथ शेळके, अमोल भोसले, शशिकांत शेळके, सुमन जाधव, भाग्यश्रीताई कदम, रुपेश गायकवाड, कुणाल घोडके, सुनील माने, नरसिंग कोळी, राधा मोरकडे, पार्वती साखरे, सुशिला शिंदे, नरसिंह आसादे, देवाभाऊ गायकवाड, बसवराज म्हेत्रे, सुशील बंदपट्टे, अशोक कलशेट्टी, सिद्धाराम चाकोते, गोपाळ नंदुरकर, तिरुपती परकीपंडला, युवराज जाधव, विवेक इंगळे, रामसिंग आंबेवाले, परशुराम सतारेवाले, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, जेम्स जंगम, बाबू म्हेत्रे, अरुणा बेंजारापे, शिवशंकर अंजनाळकर, नागेश म्हेत्रे, रमेश फुले, लखन गायकवाड, पृथ्वीराज नरोटे, चंद्रकांत टिक्के, श्याम केंगार, अप्पासाहेब सलगर, आनंद जमदाडे, सौरभ साळुंखे, भीमाशंकर बोध्याळ, मोहसीन फुलारी, दीपक मठ, अभिषेक अच्युगटला, मुमताज शेख, गणेश वड्डेपल्ली यांच्यासह इतर पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# अन्न व औषध विभागाकडून मोठी कारवाई दोन वाहनासह 26 लाख 12 हजार अन्न पदार्थाचा साठा जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-**दिनांक 5 ऑगस्ट 2024 रोजी दक्षता विभागाचे सह आयुक्त डॉ.राहूल खाडे यांच्याकडून प्राप्त गोपनिय माहितीच्या अनुषंगाने पुणे विभागातील विशेष भरारी पथकाचे सहायक आयुक्त देसाई यांना तात्काळ बार्शी येथे जाण्यास सांगितले. त्यावरून देसाई हे सर्व अन्न सुरक्षा अधिकारी रेणुका पाटील, नंदीनी हिरेमठ व उमेश भुसे यांच्यासह बार्शी तालुक्यातील मु.पो. कोरफले, ता बार्शी, जिल्हा सोलापूर या ठिकाणी हजर झाले. सदर ठिकाणी नेताजी तानाजी बरडे यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच-12 एलटी-9853 व महिंद्रा पिकअप वाहन क्र.-13 एएन-3955 हे दोन्ही वाहने संशयरित्या थांबल्याचे सदर पथकास आढळून आले. त्यानंतर सदर पथकाने दोन्ही वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये बादशहा गुटखा या प्रतिबंधित अन्न पदार्थाचे एकूण 35 पोती, किंमत रुपए 16 लाख 12 हजार 800 रुपए तसेच महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच-12, एलटी 9853 किंमत रुपए 5 लाख व महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच-13 एएन-3955 किंमत रुपए 5 लाख असे एकूण एकत्रित किंमत रुपए 26 लाख 12 हजार 800 चा मुद्देमाल आढळून आला. त्यानंतर सदर प्रकरणी रेणुका पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी पुढली कारवाई घेऊन बार्शी तालुका पोलिस स्टेशन, बार्शी येथे रात्री उरिशपर्यंत फिर्याद दाखल करण्याचे कामकाज चालु होते. तसेच उपरोक्त प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करूण ताब्यात घेण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई दक्षता विभागाचे सह आयुक्त डॉ.राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष भरारी पथकाचे सहायक आयुक्त देसाई, अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती रेणुका पाटील, श्रीमती नंदिनी हिरेमठ व उमेश भुसे यांच्या पथकाने पुर्ण केली. असे अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त देसाई यांनी सांगीतले.

# जिल्ह्यातील आजी माजी सैनिकांसाठी महसूल विभागामार्फत 10 ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व सेवारत सैनिक व त्यांचे अवलंबित यांना महसूल सप्ताहानिमित्त शनिवार दि.10 ऑगस्ट रोजी सर्व तालुक्यामध्ये आजी माजी सैनिकांसाठी महसूल दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यादिवशी तहसिलदार व महसूल कर्मचारी आजी माजी सैनिकांच्या महसूल संबंधित कामे करण्यासाठी तहसिल कार्यालयात उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये विविध कामांचा समावेश करण्यात आला आहे.

राष्ट्रीय सुरक्षिततेल्या कामी सीमावर्ती भागामध्ये व सुरक्षिततेच्या दृष्टिने अन्य संवेदनशील भागांमध्ये तैनात असणारे संरक्षक दलातील अधिकारी, सैनिक यांना व त्यांच्या कुटुंबियांना आवश्यक असणारे, महसूल कार्यालयाकडून निर्गमित होणारे विविध दाखले, प्रमाणपत्रे मिळणेबाबत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किंवा समादेशक अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अर्जावर कार्यवाही करण्यात येईल.

संरक्षण दलात कार्यरत असताना शहीद झालेल्या कर्मचाऱ्यांना जमीन वाटप करण्याबाबत प्रलंबित असलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच संरक्षण दलातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी यांना घरासाठी, शेतीसाठी जमीन वाटपाबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात येतील.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयाशी समन्वय साधून संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यात येतील असे तुंगार यांनी सांगितले आहे.

प्रत्येक तहसिल कार्यालयात एक नोडल अधिकारी नेमण्यात आला आहे. शासनाच्या सदर उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी उत्तर व दक्षिण सोलापूर तहसीलमधील जास्तीत जास्त आजी माजी सैनिकांनी व त्यांच्या अवलंबितांनी सर्व कागदपत्रासह 2 प्रतित अर्जासह दिनांक 10 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 11 वाजता उत्तर व दक्षिण सोलापूर तहसिल कार्यालयात उपस्थित रहावे.

तसेच इतर तालुक्यातील जास्तीत जास्त माजी सैनिकांनी व त्यांच्या अवलंबितांनी अडी-अडचणी बाबतची निवेदने सहपत्रासह दोन प्रतित संबंधित तहसिल कार्यालयात दिनांक 10 ऑगस्ट रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 या कालावधीत सादर करावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.